भिवंडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ७६ /२०२६ दि. ०२ /०४/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

ज्याअर्थी, भिवंडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत दि. ०४/०४/२०२६ रोजी हाफीजीबाबा दर्गा ट्रस्ट तर्फे **'हाफीजीबाबा दर्गा संदल व मिरवणूक'** आयोजित करण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :—

प्रवेश बंद – १) छत्रपत्री शिवाजी महाराज चौकातून वंजारपट्टी नाक्या कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **छत्रपती शिवाजी महाराज चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची जड, मध्यम व हलकी वाहने छत्रपती शिवाजी महाराज चौक – कोंबडपाडा – संगमपाडा – मेट्रो हॉटेल – वंजारपट्टी नाका येथे वळसा घेवून इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – २) वंजारपट्टी नाका ते छत्रपती शिवाजी महाराज चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **वंजारपट्टी नाका व वंजारपट्टी उड्डाणपूल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – एस.टी./के.डी.एम.टी, टी.एम.टी. बसेस एस.टी.स्टॅन्ड येथे प्रवाशी उतरवतील व तेथुनच प्रवाशी भरून इच्छित स्थळी जातील व इतर वाहने वंजारपट्टी नाका येथून वळसा घेवून परत जातील.

सदरची अधिसुचना दि. ०४/०४/२०२६ रोजी दुपारी १६:०० ते **'हाफीजीबाबा दर्गा संदल व मिरवणूक'** संपेपावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण
मा. आयुक्त, निजापूर शहर महानगरपालिका, भिवंडी/बृहन्मुंबई
मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२/वि.शा.ठाणे.

प्रत कार्यवाहीसाठी :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी भिवंडी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, भिवंडी
विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, भिवंडी
नियंत्रण कक्ष अधिकारी, भिवंडी/ठाणे.

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष ,ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, भिवंडी व पो.निरी. भिवंडी, नारपोली, कोनगांव वाहतूक उप विभाग ठाणे.